# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक
## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 158 |
| स्थळ | : | यश इंटरनॅशनल - सभागृह,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422 222 |
| वार व दिनांक | : | बुधवार, दिनांक : 21 सप्टेंबर 2016 |
| वेळ | : | दुपारी २ वा. |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

## कार्यवृत्त

158 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक, बुधवार, दिनांक 21 सप्टेंबर , 2016 रोजी दुपारी 2 वाजता, यश इंटरनॅशनल सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा.प्रा.डॉ. दिलीप म्हैसेकर, प्रभारी कुलगुरु. — अध्यक्ष
2. मा. श्री. ज्ञानदेव नाठे, सहसंचालक,तंत्रशिक्षण,नाशिक — सदस्य
3. मा. श्री. सतिश सुर्यवंशी,सहसंचालक,- संचालक,व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी — सदस्य
4. मा. धनराज माने, संचालक,उच्च शिक्षण,पुणे — सदस्य
5. मा. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग,यचममुवि,नाशिक — सदस्य
6. मा. श्री.हेमंत टकले, मुंबई — सदस्य
7. मा.डॉ.व्ही.एल.माहेश्वरी, जळगाव — सदस्य
8. मा. डॉ. एस.ए. ठोंबरे, औरंगाबाद — सदस्य
9. मा. प्रा. कपिल कुमार, नवी दिल्ली — सदस्य
10. डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव — सचिव

वित्त अधिकारी आणि परीक्षा नियंत्रक हे निमंत्रित म्हणून बैठकीस हजर होते.

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

1. मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई — सदस्य
2. मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
3. मा. सचिव, कृषी, मुंबई — सदस्य
4. मा.डॉ.डब्ल्यु.एन.गाडे,कुलगुरू,पुणे — सदस्य
5. मा.डॉ.बंदी व्यंकटेशवारलु,कुलगुरू,परभणी — सदस्य
6. मा. डॉ. विद्या येरावडेकर, पुणे — सदस्य
7. मा.श्री.उल्हास एन. गवळी, औरंगाबाद — सदस्य
8. मा. डॉ. आर.सेशा अय्यर, मुंबई — सदस्य

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 158.1.00 | | स्वागत<br>मा.कुलसचिव यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. व बैठकीस सुरवात करण्यात आली. |
| 158.2.00 | 158.2.01 | दि. 25 जून, 2016 रोजी झालेल्या 156 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून त्यावर मा.कुलगुरू यांनी स्वाक्षरी करणे<br>व्य.मं.ठराव: दि. 25 जून, 2016 रोजी झालेल्या 156 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्तांत वाचून कायम करुन त्यावर मा.कुलगुरु यांनी स्वाक्षरी केली |
| | 158.2.02 | दि. 25 जून, 2016 रोजी झालेल्या 156 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>व्य.मं.ठराव: - दि. 25 जून, 2016 रोजी झालेल्या 156 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत झालेल्या |

| | | |
|---|---|---|
| | | निर्णयावरील कार्यवाही अहवालातील विषय क्र. 156.4.2 येथे निवड समितीच्या अहवालानुसार योग्य अमेदवार उपलब्ध झाला नाही व निवड समितीचा अहवाल स्विकारण्यात आला याची नोंद घेण्यात आली. असे नमूद करावे व विषय क्र. 156.5.4 मध्ये श्री.शिलानाथजाधव यांना जा.क्र.-यचमहुवि-आस्था-३४२-२०१६ नुसार नियुक्ती आदेश पाठविला असून श्री.जाधव दि.१.७.२०१६ रोजी रुजू झाले आहे. असे नमूद करून सदरील दुरुस्ती करून घ्यावी व इत्तर झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| 158.3.00 | • | सखोल चर्चा करण्याचे विषय |
| | 158.3.01 | ग्रंथालय समितीच्या दि. 08.07.2016 च्या बैठकीत सन 2016-17 या वर्षासाठी वाचन साहित्य संदर्भात ट्रेड टर्मस तुलनात्मक तक्ता विचारार्थ.<br>व्य.मं.ठराव: - ग्रंथालय समितीच्या दि. 08.07.2016 च्या बैठकीत सन 2016-17 या वर्षासाठी वाचन साहित्य संदर्भात ट्रेड टर्मसच्या तुलनात्मक तक्त्यानुसार<br>१) वाचनसाहित्याच्या एका प्रतीसाठी, दोन ते पाच प्रतीसाठी व सहा ते दहा प्रतीसाठी ज्या पुरवठाधारकांनी जास्तीत जास्त वजावट देवू केली आहे, त्या पुरवठाधारकाकाडून वाचन साहित्य खरेदी करण्यास<br>२) शासकीय प्रकाशन, संस्थांची प्रकाशने, अभिजात प्रकाशने, नियतकालिके, कमी वजावट असलेली प्रकाशने, वजावट नसलेली प्रकाशने जीओसी च्या परिपत्रकानुसार घेण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 158.3.02 | विद्यापीठाने दि. 11.08.2016 रोजी शिपाई संवर्गातून सहायक पदावर पदोन्नती देण्यासाठी केलेली कार्यवाही निर्णयार्थ सादर.<br>व्य.मं.ठराव: - विद्यापीठाच्या खातेअंतर्गत पदोन्नती समितीने दि.११.८.२०१६ रोजी 'ड' संवर्गातील कर्मचा-यांना सहायक पदी पदोन्नती देण्यासंदर्भात मुलाखतीचे आयोजन करण्यात आले.त्यामध्ये लेखी चाचणी,संगणक प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षा घेण्यात आली. ती ग्राह्य न धरता, महाराष्ट्र शासनाच्या, सामान्य प्रशासन विभागाने, वेळोवेळी निर्देशित केलेल्या शासननिर्णयानुसार गट 'ड' संवर्गातील कर्मचा-यांना लिपिक किंवा टंकलेखक पदावर पदोन्नती देतांना अनुसरावयाच्या कार्यपध्दती तसेच सेवाज्येष्ठता व पदोन्नती यासंदर्भात दिलेले शासन निर्णय याचा अवलंब करूनच पुढील कार्यवाही करावी यास मान्यता देण्यात आली. |
| | 158.3.03 | विद्यापीठात नेमण्यात आलेल्या सुरक्षा एजन्सीला मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.<br>व्य.मं.ठराव – नवीन एजन्सीची निवड करण्यासाठी ई-टेंडरींग प्रक्रिया सुरू करण्यात येऊन यापूर्वी विद्यापीठात नेमण्यात आलेल्या मे. स्वराज एंटरप्रायजेस,पुणे या एजन्सीला सहा महिन्यासाठी पूर्वीच्याच अटी व शर्तीनुसार मुदतवाढ देऊन जे आधी घडेल या तत्वावर मान्यता देण्यात आली. |
| | 158.3.04 | स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्यास शैक्षणिक शुल्क सवलत देण्याची बाब विचारार्थ.<br>व्य.मं.ठराव – स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्यास शैक्षणिक शुल्क सवलत अथवा शुल्क परतीबाबत महाराष्ट्र शासनाचा शासननिर्णय क्र. एनडीएफ/२००४/(६१३/०४)केंपुयो दि.२५ ऑक्टोबर २००४ नुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 158.3.05 | सकाळ माध्यम समुह आयोजित हॉर्टिकल्चर कॉन्फेक्ससाठी सहकार्य मिळणेबाबतची बाब विचारार्थ.<br>व्य.मं.ठराव - नोव्हेंबर २०१६ मध्ये सकाळ आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हॉर्टिकल्चर कॉन्फेक्स २०१६ आयोजित करण्यास तसेच दि.९ सप्टेंबर २०१६ च्या सकाळ पेपर प्रा. लि., नाशिक यांच्या पत्रानुसार विद्यापीठाकडून अपेक्षित सहकार्य करण्यास व परिषदेसाठी विद्यापीठाकडून रु. एक लक्ष आर्थिक पाठबळ देण्यात मान्यता देण्यात आली. |
| | 158.3.06 | विव्दत परीषद सदस्य, श्री प्रभाकर करंदीकर यांनी विद्वत परीषदेचा वैयक्तिक कारणामुळे दिलेला राजीनामा |

| | | |
|---|---|---|
| | | स्विकारण्याची बाब विचारार्थ.<br>व्य.मं.ठराव – विद्वत परिषद सदस्य श्री.प्रभाकर करंदीकर यांनी वैयक्तिक कारणासाठी दिलेला सदस्यात्वाचा राजीनामा मंजूर करण्यात आला. |
| | 158.3.07 | प्रवेश अर्जांची मुदत संपल्यानंतर प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यास घेण्यात येणाऱ्या विलंब शुल्काची बाब विचारार्थ.<br>व्य.मं.ठराव – यशस्वी इन्स्टिटयूट,पुणे या अभ्यासकेंद्रावरील विद्यार्थ्यांच्या प्रवेश आणि शुल्काबाबत सत्यशोधन समित्ती गठित करण्यात यावी. या समितीतील सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देऊन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 158.3.08 | श्रीमती मनिषा राजू जाधव यांच्या नियुक्ती आणि सेवेत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>व्य.मं.ठराव – श्रीमती मनिषा राजू जाधव यांच्या नियुक्ती आणि सेवेत कायम करण्याबाबत व्यवस्थापन मंडळ सदस्य श्री.ज्ञानदेव नाठे यांनी सुचविल्याप्रमाणे त्यांच्या पदाच्या आरक्षणाची जागा उपलब्ध झाल्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही करावी यास मान्यता देण्यात आली. |
| | 158.3.09 | विद्यापीठातील नियमित कर्मचा-यांना दिवाळीसाठी सानुग्रह अनुदान देण्याबाबतची बाब विचारार्थ<br>टिपणी – विद्यापीठातील कायम सेवेतील नियमित वेतनश्रेणीतील सर्व शिक्षक,शिक्षकेतर अधिकारी व कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान दरवर्षी देण्यात येते दि.१४ऑक्टो २०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळ ठराव क्र.१.५.३ नुसार सन २०१३-१४ साठी खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात देण्यात आले होते.<br>०१)नियमित कर्मचारी - रु. २२,०००/-<br>०२)करारावरील कर्मचारी - रु. १६,५००/-<br>०३)पीआरओ/लेखापाल / डेटा ऐंट्री ऑपरेटर – रु. ११,०००/-<br>०४)सफाई ,सुरक्षा व इतर – रु. १,७००/-<br>याप्रमाणे सन २०१४-१५साठी, व्यवस्थापन मंडळ ठराव क्र.१५०.४.३८ नुसार वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार मागीलवर्षीप्रमाणे केलेल्या नियमानुसार सानुग्रह अनुदान (Salary & Allowences) ह्या लेखाशीर्षातून देण्यास मान्यता देण्यात आली होती.<br>व्य.मं.ठराव -सन २०१४-१५ मध्ये केलेल्या शिफारशीनुसार व मागील वर्षी केलेल्या. नियमानुसारच २०१५-१६साठी<br>०१)नियमित कर्मचारी - रु. २२,०००/-<br>०२)करारावरील कर्मचारी - रु. १६,५००/-<br>०३)पीआरओ/लेखापाल / डेटा ऐंट्री ऑपरेटर – रु. ११,०००/-<br>०४)सफाई ,सुरक्षा व इतर – रु. १,७००/-<br>सानुग्रह अनुदान (Salary & Allowences) ह्या लेखाशीर्षातून देण्यास मान्यता देण्यात आली. |
| 158.4.00 | | माहितीस्तव सादर करण्याचे विषय |
| | 158.4.01 | सन 2016-17 या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाच्या शिक्षणक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेली मान्यता माहितीस्तव सादर.<br>व्य.मं.ठराव – सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठ अनुदान आयोग,नवी दिल्ली यांच्या दि.८ जुलै २०१६ चे पत्रानुसार ७८ शिक्षणक्रमांना व दि.५.८.२०१६ च्या २४ शिक्षणक्रमांना असे एकूण १०२ शिक्षणक्रमांना मान्यता देण्यात आल्याची नोंद घेण्यात आली. |
| | 158.4.02 | विद्यापीठातील वित्त अधिकारी यांचे विद्यमान विविध संस्थाशी असलेले हितसंबंध घोषित करण्याबाबत. |

| | | |
|---|---|---|
| | | व्य.म.ठराव — विद्यापीठाचे वित्त अधिकारी श्री.शिलानाथ जाधव यांनी विद्यमान विविध संस्थांशी असेलेल हितसंबंध घोषित केलेले आहे व यास मा.कुलगुरू यांनी मान्यता दिलेली आहे याची नोंद घेण्यात आली. |
| | 158.4.03 | डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव यांच्या अंशदायी व निवृत्तीची रक्कम महाराष्ट्र शासनाच्या नागपूर येथील लेखा व कोषागार कार्यालयात भरणा करण्यासंदर्भात.<br>व्य.म.ठराव — डॉ.दिनेश भोंडे, कुलसचिव यांच्या कुलसचिव पदाच्या कालावधीचे रजा वेतन अंशदान व निवृत्तीवेतन अंशदान विद्यापीठाकडून महालेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यास मा.कुलगुरू यांनी मान्यता दिलेली आहे याची नोंद घेण्यात आली. |
| 158.5.00 | | मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय |
| | 158.5.01 | अभ्यासकेंद्राचा हिस्सा घेण्याबाबत करावयाची कार्यवाही विचारार्थ सादर<br>व्य.म.ठराव — विद्यापीठातील (१) वास्तूकला विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा (२) निरंतर शिक्षण विद्याशाखा (३) संगणकशास्त्र विद्याशाखा (४) आरोग्य विज्ञान विद्याशाखा या विद्याशाखा अंतर्गत ज्या शिक्षणक्रमांचे विद्यापीठ व अभ्यासकेंद्राचे एकुण शुल्क रु.२०,०००/-च्या पुढे आहे अशा शिक्षणक्रमांसाठी चार समान हफ्त्यात शुल्क घेण्यास व सदरचे शुल्क ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाकडे जमा करण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 158.5.02 | विद्यापीठास आयकर खात्याकडून प्राप्त झालेल्या नोटीसांबाबत....<br>आयकर कायदा कलम १४७ अन्वये विद्यापीठाने आयकर रिटर्न्स न भरल्याबाबत आयकर खात्याकडून नोटीस (AAALY0016C/223 and 224 दिनांक 13/7/2016)प्राप्त झालेल्या होत्या.सनदी लेखापाल व विद्यापीठाचे आयकर सल्लागार श्री.हितेश टाटीया यांचेकडून या प्राप्त झालेल्या नोटीसांनी दिनांक 23/8/2016 रोजी देण्यात आले. तसेच श्री टाटीया यांनी विद्यापीठास सोबत जोडलेली टिपणी सादर केली व विद्यापीठाने आयकर खाते कलम 12-A नुसार Tax Exemptions साठी आयकर खात्याकडे अर्ज करावा असे सुचविले.त्यानुसार तत्कालीन मा.कुलगुरू व वित्त अधिकारी,वित्त विभागाचे उपकुलसचिव यांची श्री टाटीया यांचेसमवेस बैठक झाली. त्यानुसार विद्यापीठास आयकर रिटर्न्स भरल्यास सुमारे ५० कोटी रुपयांची कर भरावा लागेल असे श्री टाटीया यांनी सांगितले. त्यावर चर्चा होऊन याबाबत Exemptions मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच आयकर खात्यातील तज्ञ व्यत्ती अथवा वकीलांचा Second Opinion घेऊन पुढील कार्यवाही करावी असे तत्कालीन कुलगुरूंनी सांगितले. त्यानुसार Exemptions मिळविण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली, त्यात Registration Under Section 12-A करण्यासाठी प्रयत्न केले व 12-A प्रमाणपत्र मिळाले आहे.त्यानंतर Application Under Section 10 (23C) (vi) नुसार अर्ज यकर खात्याच्या पुणे कार्यालयात तसेच औरंगाबाद कार्यालयात दिनांक ६/९/२०१६ रोजी सादर करण्यात आलेला आहे.<br>आयकर खात्यात रिटर्न्स भरल्यास आयकर खाते उत्पन्नावर सुमारे ६० कोटी रुपयांपर्यंत कराचे दायीत्व निर्माण होऊ शकेल असे श्री.टाटीया यांनी सांगितले आहे. सदर कर माफ करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील, त्यासाठी आयकर तज्ञ (Retired Officer from Income Tax Department not below the rank of Commissioner)किंवा या विषयातील तज्ञ ज्येष्ठ वकील यांचे मार्गदर्शन घेण्यासाठी नियुक्ती करावी लागेल. यासाठी मा.कुलगुरू यांना असे तज्ञ निवडून नियुक्त करण्यासाठी प्राधिकृत करण्यास मान्यता मिळावी.<br>व्य.म.ठराव—विद्यापीठास आयकर खात्याकडून प्राप्त झालेल्या नोटीसांबाबत आयकर माफ करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी आयकर तज्ञ (Retired Officer from Income Tax Department not below the rank of Commissioner)किंवा या विषयातील तज्ञ ज्येष्ठ वकीलांची नियुक्ती करण्याचे अधिकार मा.कुलगुरूंना देण्यात आलेले आहे यास मान्यता देण्यात आली. |

सचिव,
व्यवस्थापन मंडळ

अध्यक्ष 28.09.16
व्यवस्थापन मंडळ